CMYK

**RBI ने CIBIL स्कोअरबाबत बनवले हे ६ नवीन नियम; १ तारखेपासून झाली अंबलबजावणी** >> पान 2

**एखादी निवडणूक हरलो म्हणून शिवसेना संपत नसते- अंबादास दानवे** >> पान 3

**गरज सरो वैद्य मरो हा भाजपचा धर्म आहे** >> पान 4

**सुविचार**

आपल्या क्षमतांवर विश्वास ठेवल्यास यश मिळते.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




**वरुण धवनच्या हिरोईनचा मोठा निर्णय, चित्रपट रिलीज होण्यापूर्वीच करणार लग्न**


■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई आतील पान

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 113 ■ मंगळवार, दि. 03 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# नागपूर काँग्रेसमधील अंतर्गत वाद फुटपाथवर

## पक्ष कार्यालयाला कुलूप असल्याने बंटी शेळकेंचा संताप, नाना पटोलेंवर घणाघात

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** :काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि मध्य नागपूरचे काँग्रेस उमेदवार बंटी शेळके यांच्यातील वाद आता फुटपाथ पर्यंत पोहोचला आहे. नागपूर शहर काँग्रेस कार्यालयाला नाना पटोले यांच्या सांगण्यावरून कुलूप लावण्यात आले आहे. त्यामुळे आम्हाला महापालिका निवडणुकीच्या तयारीसाठीची बैठक फुटपाथवर घ्यावी लागत असल्याचा आरोप बंटी शेळके यांनी केला आहे.

शहर काँग्रेसचे कार्यालय असलेल्या देवडिया काँग्रेस भवनात आज दुपारी बंटी शेळके आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी महापालिका निवडणुकीच्या तयारीची बैठक बोलावली होती. मात्र नियोजित वेळी कार्यालयाला कुलूप दिसून आले. त्यानंतर बंटी शेळके आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस कार्यालयाच्या समोर रस्त्यावर आणि फुटपाथवर बसून बैठक पार पाडली. नाना पटोले यांच्या सांगण्यावरूनच कार्यालयाला कुलूप लावण्यात आले असून नाना पटोले यांनी संपूर्ण काँग्रेस पक्षालाच कुलूप लावल्याचा आरोप बंटी शेळके यांनी केला आहे.

एवढंच नाही तर नाना पटोले यांनी साकोलीची निवडणूक देवेंद्र फडणवीस आणि भाजपसोबत फिक्स केली. तिथे स्वतःचा निसटता विजय सुनिश्रि्चत करून नाना पटोले यांनी राज्यात इतरत्र काँग्रेसला पराभूत केल्याचा गंभीर आरोप ही बंटी शेळके यांनी केला आहे. त्यामुळे नागपूर काँग्रेसमधील अंतर्गत वाद आता थेट फुटपाथपर्यंत आल्याचे बघायला मिळतो आहे.

विधानसभा निवडणूकमध्ये काँग्रेस





पक्षाच्या दारुण पराभवानंतर काँग्रेसमध्ये अंतर्गत द्वंद्व सुरु झाले आहे का? आणि पक्षातील नाना पटोले विरोधी गटाने त्यासाठी नागपूर मध्य मतदारसंघातील पराभूत काँग्रेस उमेदवार बंटी शेळके यांना आपले मोहरा बनविला आहे का? असा प्रश्न्न निर्माण झाला आहे. त्याचे कारण म्हणजे नाना पटोले हे आरएसएसचे एजंट आहेत, असा गंभीर आरोप केल्यानंतर बंटी शेळके यांनी पुन्हा एकदा नाना पटोले यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

दरम्यान, बंटी शेळके यांनी नाना पटोले यांच्या विरोधात मोहीम उघडी असली, तरी राजकीय दृष्ट्या ते एकटे नाहीत. त्यांच्या पाठीशी महाराष्ट्रातील नाना पटोले विरोधी काँग्रेस गट सक्रिय असल्याचे बोलले जात आहे.

त्यामुळेच नाना पटोले ही पक्ष श्रेष्ठींपर्यंत आपली बाजू मांडण्यासाठी दिल्लीत पोहोचल्याची माहिती आहे. आता बंटीच्या माध्यमातून नानांवर हल्लाबोल करण्याचे हे प्रयत्न काँग्रेमध्ये नव्या वादाचे कारण बनते की, याच्यातून पराभूत झालेल्या काँग्रेसमध्ये खरंच सकारात्मक मंथनाला सुरुवात होऊन काँग्रेसचा काही भले होतं, हे येणाऱ्या काही दिवसात स्पष्ट होईल.

## वंचित बहुजन आघाडीच्यावतीने राज्यभरात ईव्हीएम विरोधी जनआंदोलनाची हाक



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राज्यभरात ईव्हीएम विरोधी जनआंदोलनाची हाक देण्यात आली आहे. स्वाक्षरी मोहिमेपासून सुरुवात करून टप्याटप्प्याने हे आंदोलन तीव्र करण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर रविवारी पुणे येथे झालेल्या राज्य कार्यकारिणी बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून ३ डिसेंबर ते १६ डिसेंबर पर्यंत राज्यात ईव्हीएम विरोधी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ऍड. बाळासाहेब आंबेडकर यांनी व्हिडिओच्या माध्यमातून राज्यातील मतदारांना ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. ईव्हीएमच्या विरोधात न्यायालयीन लढाई सुद्धा ते लढत आहेत. पत्रकार परिषदेच्या माध्यमातून ईव्हीएम वापरामधील मधील अनेक घोळ त्यांनी माध्यमासमोर मांडले आहेत. ईव्हीएमच्या विरोधात आरपारची लढाई लढण्याचा निर्णय वंचित बहुजन आघाडीने घेतला आहे. वंचित बहुजन आघाडीचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते हे आपापल्या विभागात ही मोहीम राबवणार आहेत. सर्व मतदारांनी या मोहिमेत सहभागी होऊन ईव्हीएमला हद्दपार करण्यासाठी हातभार लावावा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात येत आहे.

## मराठवाड्यातील संघटनात्मक विषयांसंदर्भात श्रीकांत शिंदेंची भेट घेतली : अर्जुन खोतकर यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नाही तर खासदार श्रीकांत शिंदे यांना भेटायला आलो होतो, मराठवाड्यातील काही राजकीय आणि संघटनात्मक विषय घेऊन आलो होतो, त्यावर चर्चा केली.अशी माहिती आमदार आमतदार अर्जुन खोतकर यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी अर्जुन खोतकर म्हणाले की, एकनाथ शिंदे आराम करत आहेत, त्यांची तब्येत ठीक आहे. मंत्री कोणाला व्हावे वाटत नाही पण हा विषय हा वरच्या पातळीचा आहे. याचा निर्णय पक्ष नेतृत्व घेईल,आज याबाबत कुठलीही चर्चा झालेली नाही.अशी माहिती आमदार अर्जुन खोतकर यांनी दिली.

## मुख्यमंत्री पदासंदर्भातील सगळे निर्णय केंद्रीय नेते घेतील : आ. प्रसाद लाड यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : आजच्या बैठकीत निवडून आलेल्या आमदारांचे स्वागत करण्यात आले. मुंबईत सर्वात जास्त मतदान भाजपला झाले, त्याबद्दल मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांचे सुद्धा स्वागत करण्यात आले.



मुख्यमंत्री संदर्भात सगळे निर्णय केंद्रीय नेते घेतील, अशी माहिती भाजपचे आमदार प्रसाद लाड यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी पुढे बोलताना आ. प्रसाद लाड यांनी सांगितले की,शपथविधीची जेव्हा कधी तारीख निश्रि्चत होईल तेव्हा सगळ्या कार्यकर्त्यांना येण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्रीपदा संदर्भातील सगळे निर्णय केंद्रीय नेते घेतील, एकनाथ शिंदे, अजित पवार व देवेंद्र फडणवीस मिळून त्यांचा निर्णय दिल्लीला देतील आणि तिथून नाव निश्रि्चत होईल. अशी माहिती आमदार प्रसाद लाड यांनी दिली.

# आजारपणाचा बहाणा करुन पळणारे एकनाथ शिंदे नाहीत

## आमदार संजय शिरसाट यांचा विरोधकांना टोला

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेण्यासाठी आलो होतो, सध्या ते आराम करत आहेत. विरोधकांनी तब्येतीचे खोटे कारण असल्याचा आरोप केला. तो चुकीचा आहे. आजारपणाचा बहाणा करुन पळणारे एकनाथ शिंदे नाहीत ते लढणारे आहेत. असे म्हणत शिवसेनेचे नेते आमदार संजय सिरसाट यांनी विरोधकांना टोला लगावला.



माध्यमांशी बोलताना सिरसाट म्हणाले की,जागावाटपाचा तिढा एक दोन दिवसात सुटेल, मुख्यमंत्रीच्या नावाची घोषणा करणे बाकी आहे. रिपोर्ट कार्ड मागवणे हा प्रक्रियेचा भाग आहे, मंत्री करत असताना त्यांच्या संबंधीत माहिती मागवली जाते. आजारपणाचा बहाणा करुन पळणारे एकनाथ शिंदे नाहीत ते लढणारे आहेत.असे म्हणत शिवसेनेचे नेते तथा आमदार संजय सिरसाट यांनी विरोधकांना टोला लगावला.

# शरद पवार ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : सरहद संस्था आयोजित अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे २१,२२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ रोजी दिल्लीत पार पडणार आहे. यापूर्वी १९५४ साली दिल्लीला ३७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले होते. त्याचे स्वागताध्यक्ष काकासाहेब गाडगीळ, संमेलनाध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी तर उद्घाटक तत्कालिन पंतप्रधान पंडित नेहरू होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीला या संमेलनानंतर बळ मिळाले आणि १ मे १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. त्यानंतर दिल्लीला एकदाही अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले नाही. यंदा पार पडणाऱ्या या साहित्य संमेलनाचं स्वागताध्यक्षपदी शरद पवार आहेत.

नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. या पार्श्र्वभूमीवर ७० वर्षांनी दिल्लीत होणार्या या संमेलनाचे आयोजन सरहद संस्थेद्वारे केले जात असून त्याचाच भाग म्हणून काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे, नितीन गडकरी, यांनाही आमंत्रित करण्यात आलं आहे. दिल्ली ही देशाची राजकीय राजधानी असल्यामूळे येथे होणारे संमेलन सर्वसमावेशक व्हावे या भावनेतून या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी अनुभवी, ज्येष्ठ व साहित्यरसिक व्यक्ती व्हावी असा संयोजक समितीने प्रयत्न केला. त्यातूनच शरद पवार यांनी स्वागताध्यक्ष व्हावे अशी संस्थेने विनंती केली आणि ती त्यांनी आज मान्य केली.

शरद पवार हे केवळ उत्तम वाचक अथवा साहित्यप्रेमी नसून महाराष्ट्रातून सांस्कृतिक आणि साहित्यीक चळवळीशी प्रारंभापासून जोडले गेले आहे. त्यांनी औरंगाबाद (२००४), नाशिक (२००५), चिपळूण (२०१३) आणि सासवड (२०१४) येथील अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन केले आहे. तर १९९० साली त्यांनी स्वागताध्यक्ष व्हावे असे पुण्यातील संमेलनात समितीने ठरविले होते मात्र त्यावर्षी ते होऊ शकले नाही. यंदा दिल्लीमध्ये महाराष्ट्राची अस्मिता ज्या व्यक्तींभोवती केंद्रीत असते त्यातून सर्वात ज्येष्ठ नाव शरद पवार यांचे आहे.

# मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पालीत घेतले श्री बल्लाळेश्वराचे दर्शन



दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी** : महाराष्ट्रातील प्रसिद्ध अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली तिर्थक्षेत्र येथे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज श्री बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले. यावेळी राज ठाकरे यांनी श्री बल्लाळेश्वराचे मनोभावे पूजन केले. श्री बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट पाली च्या वतीने राज ठाकरे यांचे स्वागत करण्यात आले.

# भाजपला जातीवादाचा फायदा झाला : आ. रोहित पवार

## पत्रकार परिषदेत ईव्हीएममध्ये फेरफार झाल्याचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : लाडक्या बहीण योजनेचा नक्कीच लाभ या निवडणुकीत भाजपला झाला१ त्याचबरोबर जातीवादाचा फायदा सुद्धा भाजपला झाला आहे. भाजपचे उमेदवार होते तिथे १० टक्यांचा लाभ ईव्हीएममध्ये फेरफार करुन झाला असल्याचे दिसते, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत केला. यावेळी ते म्हणाले की, ईव्हीएम संदर्भात काही लोकांनी अजून काही माहिती दिली आहे. या विधानसभेत भाजपचा ८८ टक्के, शिंदे गटाचा ७० टक्के, अजित पवार गटाचा ६९ टक्के स्ट्राईक रेट आहे. महायुतीता एकत्रित ८१ टक्के स्ट्राईक रेट राहिला आहे. लोकसभेला तीस टक्यांच्या आसपास होता. भाजपने १०० आमदार किंवा त्यांच्या नातेवाईकांना संधी दिली. त्यातील ९५ निवडून आले, अजित पवारांमध्ये ३९ आमदार रिपीट झाले. ३२ निवडून आले, शिवसेना शिंदे गट ४५ आमदार रिपीट झाले, ३८ निवडून आले. लाडक्या बहीण योजनेचा नक्कीच लाभ या निवडणुकीत भाजपला झाला,जातीवादाचा फायदा भाजपला झाला. भाजपचे उमेदवार होते तिथे १० टक्यांचा लाभ ईव्हीएममध्ये फेरफार करुन झाला असल्याचे दिसते तर,अजित पवार आणि शिंदे यांचे उमेदवार होते तिथे ८ टक्के फेरफार झाल्याचे दिसते आहे.माळशिरसमध्ये उत्तम जानकर एका गावात बॅलेट पेपरवर मतदान करणार आहेत. त्यातुन सत्य बाहेर येईल,नाशिक, सातारा, लातुर ग्रामीणमध्ये भाजप उमेदवारांना जवळपास समान मतदान झाले, हा फक्त योगायोग नाही त्यामागे काहीतरी गडबड आहे. ईव्हीएम बाबतीत काँग्रेस पुढाकार घेत आहे. आम्ही त्यांच्याबरोबर आहोत.उद्धव ठाकरे देखील याबाबत सकारात्मक असतील. ९ दिवस झाले, सरकार स्थापन होत नाही. एसटी महामंडळाच्या बस दरात १४ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव आला आहे. व्यावसायिक गॅस सिलेंडरमध्ये दरवाढ केली जाणार आहे. योजना दुतांचे वेतन थकले आहे. या योजना दुतांनी सरकारचा प्रचार केला. लाडकी बहीण योजनेसाठी अटीशर्ती टाकण्याची भाजपची तयारी सुरु झाली आहे. रोहित पाटील मुख्य प्रतोदपदी नियुक्ती देण्याची मीच शिफारस केली होती. मीच तो प्रस्ताव मांडला होता. आमच्या सर्वांची त्याला संमती आहे. मुख्य प्रतोद महत्वाचे पद आहे, नवख्या व्यक्तीला दिले पण आम्ही त्यांना मार्गदर्शन करु, पक्ष भविष्यात मला योग्य पद देईल.



तहसीलदार यांनी परवानगी नाकारली असली तरी उद्या माळशिरस मध्ये मतदान होणारच.अमोल मिटकरी चंगु मंगु आहे, त्यांच्यावर उत्तर देणार नाही, टीव्हीवर येणासाठी ते माझ्यावर बोलतात. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या पेक्षा चांगले काम केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष संघटनेत बदल करण्याची वेळ आली आहे. शरद पवार आणि जयंत पाटील ते बदल लवकरच करतील. बाळ्या मामा यांच्या मतदार संघात गुन्हेगारी वाढली असेल, महिला सुरक्षित नसतील म्हणून ते गेले असतील ते काय सांगत आहेत पहावे लागेल.असे मत यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केले.

CMYK

## अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी

मराठी साहित्यातील अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी यांचा आज ३ डिसेंबर रोजी ७३ वा स्मृतिदिन. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उदगारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. १९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी – अहिराणी – खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर – माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण – उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा ( मियते ) मिळते भाकर......, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला......, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...... धरित्रीले दंडवत..... यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्र्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्र्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभिने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयत्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांचा ७३ वा स्मृतिदिन आहे. स्मृतिदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!

# RBI ने CIBIL स्कोअरबाबत बनवले हे ६ नवीन नियम; १ तारखेपासून झाली अंबलबजावणी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने क्रेडिट स्कोअरबाबत एक मोठे अपडेट आणले आहे. आरबीआयकडे क्रेडिट स्कोअरबाबत सातत्याने तक्रारी येत होत्या. तक्रार आल्यानंतर काही महिन्यांपूर्वी आरबीआयने सिबिल स्कोअरबाबत ५ नवीन नियम केले होते. अलीकडेच त्यात आणखी एक नवीन नियम जोडला गेला आहे. चांगला सिबिल स्कोअर असणे प्रत्येक व्यक्तीसाठी सर्वात फायदेशीर आहे, कारण यामुळे तुम्हाला कर्ज मिळणे सोपे होते. उखइखङ स्कोर राखण्यासाठी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे पेमेंट डिफॉल्ट टाळणे. म्हणजेच, वेळेवर ईएमआय भरा. सिबिल स्कोअरशी संबंधित नवीन नियम ६ पासून लागू झाले आहेत. हे नियम केवळ कर्ज प्रक्रिया सुलभ करत नाहीत तर ग्राहक त्यांच्या क्रेडिट स्कोअरचे अधिक चांगल्या प्रकारे संरक्षण देखील करू शकतात. या ६ नियमांचा तुमच्या कर्ज सुविधा आणि क्रेडिट स्कोअरवर काय परिणाम होईल हे आपण जाणून घेणार आहोत.

**सिबिल स्कोअर १५ दिवसांत अपडेट केला जाईल**

आरबीआयच्या नवीन नियमांनुसार, आता १५ दिवसांच्या आत ग्राहकांचा सिबिल स्कोअर अपडेट केला जाईल. हा नियम १ जानेवारी २०२५ पासून लागू होणार आहे. रिझर्व्ह बँकेने वित्तीय संस्थांना वेळोवेळी ग्राहकांचे क्रेडिट स्कोअर अपडेट करण्याचे निर्देश दिले. अलीकडेच, RBI गव्हर्नरने जाहीर केले होते की सिबिल स्कोअर दर १५ दिवसांनी अपडेट केला जाईल. याद्वारे, ग्राहकाला त्याच्या सिबिल स्कोअरची नवीनतम स्थिती वेळेवर जाणून घेता येईल आणि त्याच्या कर्जाच्या पात्रतेवर चांगले लक्ष ठेवता येईल.

नवीन नियमानुसार, प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेला आणि महिन्याच्या शेवटी सिबिल स्कोअर अपडेट केला जाईल. क्रेडिट संस्था आणि क्रेडिट माहिती कंपन्या त्यांच्या सोयीनुसार इतर कोणतीही तारीख निश्र्चित करू शकतात ज्याद्वारे डेटा १५ दिवसांच्या आत अपडेट केला जाऊ शकतो. नियमांनुसार, पतसंस्थांना प्रत्येक महिन्याला ग्राहकाची क्रेडिट माहिती उखव कडे पाठवणे बंधनकारक असेल ज्या वेळी क्रेडिट स्कोअर अपडेट केला जाऊ शकतो.

**CIBIL स्कोर संबंधित माहिती पाठवावी लागेल**

मध्यवर्ती बँकेने सर्व क्रेडिट माहिती कंपन्यांना सांगितले आहे की, जेव्हाही




बँक किंवा छइऋउ ग्राहकाचा क्रेडिट अहवाल तपासेल तेव्हा ही माहिती ग्राहकांना पाठवणे आवश्यक असेल. ही माहिती एसएमएस किंवा ईमेलद्वारे पाठविली जाऊ शकते. वास्तविक, क्रेडिट स्कोअरबाबत अनेक तक्रारी पुढे येत होत्या, त्यामुळे रिझर्व्ह बँकेने हा निर्णय घेतला आहे.

**विनंती नाकारण्याचे कारण द्यावे लागेल**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मते, जर ग्राहकाची विनंती नाकारली गेली तर त्याचे कारण स्पष्ट करणे बंधनकारक असेल. यामुळे ग्राहकाला त्याची विनंती का नाकारली गेली हे समजण्यास मदत होईल. सर्व पतसंस्थांनी नाकारण्याच्या संभाव्य कारणांची यादी तयार करणे आणि ग्राहकांना माहिती प्रदान करणे खूप महत्वाचे आहे जेणेकरून ते त्यांची क्रेडिट स्थिती सुधारण्यास मदत करू शकतील.

**वर्षातून एकदा ग्राहकांना मोफत सिबिल स्कोअर**

रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) मते, क्रेडिट कंपन्यांना त्यांच्या ग्राहकांना वर्षातून एकदा मोफत सिबिल स्कोअरची माहिती द्यावी लागेल. यासाठी, क्रेडिट कंपनीला त्यांच्या वेबसाइटवर एक लिंक देखील द्यावी लागेल जेणेकरुन ग्राहक सहजपणे त्याचा क्रेडिट रिपोर्ट पाहू शकतील. यामुळे ग्राहकाला त्याचा/तिचा सिबिल स्कोअर आणि दरवर्षी संपूर्ण क्रेडिट इतिहास जाणून घेण्यात मदत होईल.

**डिफॉल्टची तक्रार करण्यापूर्वी ग्राहकाला माहिती देणे**

रिझर्व्ह बँकेच्या म्हणण्यानुसार, जर एखाद्या ग्राहकाचे कर्ज थकीत होणार असेल, तर डिफॉल्टचा संपूर्ण अहवाल देण्यापूर्वी ग्राहकाला माहिती देणे अत्यंत आवश्यक आहे. कर्ज देणाऱ्या संस्थांनी सर्व माहिती ग्राहकांना एसएमएस किंवा ईमेलद्वारे शेअर करावी. याशिवाय बँका आणि कर्ज वाटप करणाऱ्या संस्थांनी नोडल अधिकारी नेमावेत. क्रेडिट स्कोअरशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी नोडल अधिकारी काम करतील.

**३० दिवसांत तक्रारीचे निराकरण केले जाईल**

जर क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपनीने तक्रारीचे निराकरण केले नाही किंवा ३० दिवसांच्या आत ग्राहकाच्या तक्रारीचे निराकरण केले नाही, तर त्याला दररोज १०० रुपयांचा दंड भरावा लागेल. म्हणजेच जितक्या उशिरा तक्रारीचे निराकरण होईल, तितका अधिक दंड भरावा लागेल. कर्ज वाटप करणाऱ्या संस्थेला २१ दिवस आणि क्रेडिट ब्युरोला ९ दिवसांचा कालावधी मिळेल. जर बँकेने २१ दिवसांच्या आत क्रेडिट ब्युरोला माहिती दिली नाही तर बँक नुकसान भरपाई देईल. बाईकची माहिती देऊन ९ दिवसांनंतरही तक्रारीचे निराकरण झाले नाही, तर क्रेडिट ब्युरोला नुकसान भरपाई द्यावी लागेल.

# बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरण करण्याविरोधात कामगार कार्यालयासमोर धरणे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी** : भिवंडी शहरातील वेताळ पाडा येथील बांधकाम कार्यालयासमोर महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार फेडरेशन हायटेक यांच्या वतीने कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले आहे. सरकारने कल्याणकारी मंडळ बनवले आहे परंतु आतापर्यंत हे सगळे कामगार कुठूनही आपला फॉर्म भरत होते पण आता सरकारने ते सगळं पोर्टल बंद केले असून बाहेरून फॉर्म भरू शकत नसल्याने कामगारांना बांधकाम कार्यालय येथे चकरा माराव्या लागत असल्याने पोर्टल बंद असल्यामुळे त्यांना या सुविधा मिळत नसल्याने हे आंदोलन करण्यात आले.

या सुविधा लवकरात लवकर सुरू करण्यात याव्या त्या विरोधात हा मोर्चा काढण्यात आला असून सरकारने आताच मागच्या कॅबिनेटमध्ये पाच हजार रुपये दिवाळी बोनस मंजूर केलाय तो देखील कामगारांना वितरित करावा व कामगारांना भांडी मिळत होते तेही पोर्टल बंद असल्यामुळे अशा अनेक मागण्यांसाठी आज महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार फेडरेशन हायटेक यांच्या वतीने बांधकाम कार्यालयासमोर कॉ. विजय कांबळे यांच्या नेतृत्वात मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

## वरुण धवनच्या हिरोईनचा मोठा निर्णय, चित्रपट रिलीज होण्यापूर्वीच करणार लग्न

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : वरुण धवनचा 'बेबी जॉन' हा चित्रपट २५ डिसेंबरला थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाबद्दल त्याचे चाहते खूप उत्सुक आहेत. कलिस यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेल्या या चित्रपटात त्याच्यासोबत साऊथची लोकप्रिय अभिनेत्री कीर्ती सुरेश देखील दिसणार आहे. दरम्यान, कीर्ती लवकरच लग्न करणार असल्याची बातमी आहे.

कीर्ती सुरेश तिचा दीर्घकाळचा प्रियकर एंटली थाटीलसोबत लग्न करणार आहे. तिने स्वतः आपल्या लग्नाची बातमी शेअर केली आहे. वास्तविक, नुकतीच कीर्ती आंध्र प्रदेशातील तिरुपती मंदिरात पोहोचली, जिथे पापाराझींशी बोलताना तिने तिच्या लग्नाची माहिती शेअर केली.

ती म्हणाली, माझे लग्न पुढच्या महिन्यात आहे. म्हणूनच मी येथे दर्शनासाठी आली आहे. हे लग्न गोव्यातच होणार आहे. तिने लग्नाची तारीख जाहीर केली नाही, परंतु ११ आणि १२ डिसेंबर रोजी लग्नाचे कार्यक्रम होणार असल्याची चर्चा आहे. म्हणजेच 'बेबी जॉन' रिलीज होण्यापूर्वीच ती लग्न करणार आहे.

या चित्रपटात वरुण धवन आणि कीर्ती सुरेश व्यतिरिक्त वामिका गब्बी देखील दिसणार आहे. या चित्रपटात जॅकी श्रॉफ खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे. सलमान खान कॅमिओ करणार आहे. हा एक क्शन चित्रपट आहे. शाहरुख खानच्या 'जवान' चित्रपटाचे दिग्दर्शक टली हे या चित्रपटाचे निर्माते आहेत.

कीर्ती सुरेशने या महिन्यात सोशल मीडियावर एक फोटो शेअर करून त्यांच्या नात्याची पुष्टी केली होती. फोटोमध्ये दोघेही आकाशाकडे पाहताना दिसत आहेत. कीर्तीने कॅप्शनमध्ये लिहिले होते की, १५ वर्षे झाली आहेत आणि अजूनही मोजणी सुरू आहे आणि हे नेहमीच असेच राहणार आहे. या पोस्टद्वारे त्यांचे नाते पक्के झाले आणि आता दोघेही कायमचे एकत्र राहणार आहेत.

## नितीन गडकरींच्या लोकसभेतील खुर्चीत अदलाबदल

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : लोकसभेतील सचिवालयाकडून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या खुर्चीत अदलाबदल करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या शेजारी बसणाऱ्या गडीकरींना ५८ व्या क्रमांकांवर पाठवले होते. मात्र, टीका होण्याची शक्यता लक्षात घेता गडकरींना पुन्हा पुढे आणले गेले आहे. आज नितीन गडकरी यांना आसन क्रमांक ५८ देण्यात आला होता, त्यामुळं गडकरी आता चौथ्या रांगेतील पहिल्या बाकावर बसले असते. नितीन गडकरी यांचा आसन क्रमांक ४ होता त्यामुळं गडकरी दुसऱ्या रांगेत पहिल्या बाकावर बसायचे. आता पुन्हा गडकरी यांचा आसनक्रमांक पुर्ववत म्हणजेच ४ निश्र्चित करण्यात आला आहे.

# राजकारण हे असंतुष्ट आत्म्यांचा महासागर

## आज नगरसेवकापासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वचजण दुःखी, नितीन गडकरी यांच्या विधानाची चर्चा

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होऊन आतापर्यंत ९ दिवस पूर्ण झाले आहेत. पण महाराष्ट्रात सत्ता स्थापन झालेलं नाही. राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. पण तरीही सरकार स्थापन होण्यास विलंब होताना दिसत आहे. भाजप नेत्यांकडून येत्या ५ डिसेंबरला नव्या सरकारचा शपथविधीचा कार्यक्रम पार पडेल, असं जाहीर करण्यात आलं आहे. त्यानुसार तयारीदेखील सुरु झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते अजित पवार हे आज दिल्लीच्या दिशेला रवाना झाले आहेत. ते दिल्लीत जावून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणार आहेत. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खातेवाटपाबाबत चर्चा होणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. दुसरीकडे राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आजारी



आहेत. एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या होणाऱ्या मुख्यमंत्र्यांना आधीच पाठिंबा जाहीर केला आहे. पण त्यांना गृह खातं हवं आहे. याशिवाय एकनाथ शिंदे हे सध्या आजारी असल्यामुळे ते दिल्लीला चर्चे साठी गेले नसल्याची माहिती आहे. भाजपकडून देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री बनतील, असे संकेत देण्यात येत आहेत. पण तरीदेखील अधिकृतपणे त्यांचं नाव जाहीर करण्यात आलेलं नाही. भाजपचे दोन निरीक्षक उद्या राज्यात येणार आहेत. हे निरीक्षक उद्या भाजपचा विधीमंडळ नेता आणि गटनेता ठरवणार आहे. यावेळी कोण मुख्यमंत्री होणार? याबाबतच्या सस्पेन्सवर पडदा पडणार आहे. एकीकडे या सगळ्या घडामोडी सुरु असताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलेल्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे.

### 'राजकारण हे असंतुष्ट आत्म्यांचा सागर'

राजकारण हे असंतुष्ट आत्म्यांचा सागर, असं नितीन गडकरी म्हणाले आहेत. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील सध्या सुरु असलेल्या राजकीय घडामोडी आणि नितीन गडकरी यांच्या या वक्तव्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे. नगरसेवकाला, आमदारकीची आशा, तर आमदाराला मंत्रिपदाची अपेक्षा, मुख्यमंत्री झाल्यानंतर पक्षश्रेष्ठी कधी बाजूला करतील, याची भीती, असं वक्तव्य नितीन गडकरी यांनी केलं आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# एखादी निवडणूक हरलो म्हणून शिवसेना संपत नसते- अंबादास दानवे







दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्टेशन समोर बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्यासाठी नियोजित जागेवर बांधकाम करून त्या ठिकाणी आनंद दिघे यांचा पुतळा शिंदे गटाकडून बसवण्यासाठी बांधकाम सुरू होणार होते, परंतु त्या ठिकाणी ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी ते काम रोखत त्या ठिकाणी बाळासाहेब ठाकरे यांची प्रतिमा लावून पुष्पहार अर्पण केला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे येथे स्मारक होते, शहरात जनतेचे स्वागत व्हावं म्हणून इथं मोठी प्रतिमा लावली आहे. शिवसेनाप्रमुखांचं स्मारक येथून हटवून दुसरं काहीतरी करायचं, इथं कुणाचं काय करायचं मला माहित नाही. कुणाचं करायचं असेल तर करावं परंतु दुसऱ्या जाग्यावर करावं हे हटवायची गरज काय ? हे शिवसेना प्रमुखांचे छ. संभाजीनगर आहे एखादी निवडणूक हरलो म्हणून शिवसेना संपत नसते, शिवसेना अंगार आहे अशी प्रतिक्रिया ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी यावेळी दिली आहे.

शाहू महाराज यांच्यावरील पोस्टवर बोलताना दानवे म्हणाले की याला काही अर्थ आहे का ? शिवसेनाप्रमुखांचा वर फोटो असतो आणि आपण खाली बसतो यात कुठे अपमान आहे का ? भाजपवाले काहीही अर्थ काढतात. तसेच सत्ता स्थापनेचा फटका सगळ्यांनाच बसतो आहे. भाजपचा नेतृत्व अद्याप कोणी करायचं हे ठरत नाही. अधिकृत भाजपने घोषणा केलेली नाही. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी माघार घेतलेली आहे, याचा अर्थ भाजपला निर्णय घेता येत नाही किंवा भाजपाला या राज्याशी घेणे देणे नाही असा होतो अशी टिका दानवेंनी केली आहे. संतोष बांगर आणि संजय राऊत यांची कुठे बराबरी होऊ शकते का ? असा प्रश्न अंबादास दानवेंनी उपस्थित केलाय. रावसाहेब दानवेंच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना अंबादास दानवे म्हणाले की आता बरेच कंठ फुटत आहेत, निवडणुकीच्या काळात हवा गुल झाली होती, तुम्हीच दूर केलं आहे.

## महत्त्वाचे...

### चोपडा तालुक्यात पशुगणनेला प्रारंभ; २८ फेब्रुवारी पर्यंत पशु गणना सुरू राहणार



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : राज्यात केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत पशु गणनेला प्रारंभ झाला आहे. चोपडा तालुक्यात २५ नोव्हेंबर पासून पशुगणनेला सुरुवात करण्यात आली आहे. २८ फेब्रुवारी पर्यंत ही गणना सुरू राहणार आहे. यासाठी शासकीय, खाजगी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक गावात पशु मालकांच्या घरी जाऊन संपूर्ण माहिती प मध्ये संकलित करण्यात येत आहे. पशु गणना बरोबर पशुंना टॅग लावण्याचे काम देखील सुरू आहे. आतापर्यंत चोपडा तालुक्यात ७० टक्के पशुंना टॅग लावण्यात आले आहेत. येणाऱ्या काळात देखील पशु गणना सोबत पशुंना टॅग लावण्याचा काम सुरू राहणार असल्याचे पशुवैद्यकीय अधिकारी श्र्वेता यांनी सांगितले आहे.

### नगर विकास विभागाच्या वतीने शहरात ठिकठिकाणी राबविण्यात येतेय जनजागृती अभियान



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाच्या वतीने जालना शहरांमध्ये आज दुपारपासून ठिकठिकाणी स्वच्छते विषयी जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. यासाठी पथनाट्य, गीत-गायन तसेच विविध माध्यमातून उपक्रमाद्वारे नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जागृती करण्यात येत आहे. तसेच घनकचरा, प्लास्टिक व इतर कचऱ्यांच्या बाबतीत देखील जनजागृती करण्यात येत असून जालना शहरातील रेल्वे स्टेशन, वीर सावरकर चौक, महानगरपालिका कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा तसेच गांधी चमन या परिसरामध्ये पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची नियमित पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येणार असल्याने कचरामुक्त शहरे हा उपक्रम राबविण्यात येत आहे. तसेच ओला कचरा, सुका कचरा, बायो मेडिकल घातक कचरा याबाबतीत पथनाट्याच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. याविषयी नंदा गायकवाड यांनी अधिक माहिती दिली आहे.

### तेलाच्या दरवाढीमुळे दुकानदार व ग्राहक हैराण





दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : गणेशोत्सवापासून आतापर्यंत तेलाचे दर झपाट्याने वाढले आहेत. सध्या मार्केटमध्ये सूर्यफूल तेलाचा १५ किलोचा भाव २२८० रुपये, पाम तेलाचा २१८० रुपये, तर सोयाबीन तेलाचा भाव २०५० रुपये आहे. व्यापाऱ्यांच्या मते पाम तेलाच्या दरात तब्बल ३०० रुपयांची वाढ झाली असून, सूर्यफूल तेलावर २५% आयात शुल्क लावल्यास दर आणखी वाढण्याची शक्यता आहे. सध्या सोयाबीन तेलाचे भाव कमी आहे. दुकानदारांच्या म्हणण्यानुसार, तेलाच्या वाढत्या किमतींमुळे सामान्य ग्राहकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. वाढती दरवाढ ग्राहकांसाठी अडचणीची ठरत असून, सर्वसामान्यांच्या जीवनावर याचा गंभीर परिणाम होत आहे. सरकारने तेलाच्या किंमती कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना करावी, अशी ग्राहक आणि व्यापाऱ्यांची मागणी आहे. जेणेकरून तेल परवडण्याजोगं होऊन सर्वसामान्यांना दिलासा मिळेल.



# जागतिक एड्स प्रतिबंधक दिनानिमित्त जनजागृती रॅलीचे आयोजन





**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : जागतिक एड्स प्रतिबंधक दिनानिमित्त आज जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीला जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी क्रांती चौक येथे हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ केले. मार्ग हक्काचा, मार्ग सन्मानाचा या घोषवाक्यासह यावर्षी एड्स प्रतिबंधात्मक जाणीव जागृती सप्ताह आणि वर्ष साजरे करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेने एड्स आजाराच्या प्रतिबंधात्मक उपचार व उपाय योजना व जाणून जागृती माध्यमातून एड्स बाधितांना समुपदेशन उपचार देण्यात येतात. याचाच एक भाग म्हणून रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीमध्ये घाटी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी शूक्रे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दयानंद मोतीपवळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर यांच्यासह आरोग्य विभागातील विविध अधिकारी, कर्मचारी विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते. मदन मिमरोट यांच्या चमूने कलापथकाद्वारे या रॅलीत जनजागृती केली. मराठवाडा सांस्कृतिक क्रीडा मंडळ येथे रॅली संपन्न झाली.


### पहिली बायको मेली, दुसरीशी लग्न केलं तिला अंधारात ठेवून तिसरीला फसविले; डोंबिवलीच्या भामट्याला पोलिसांनी केली अटक



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी** : पहिली पत्नी मेली. दुसरीशी लग्न केले. तिला सुद्धा अंधारात ठेवून तिसऱ्या तरुणीशी लग्न करुन तिच्यावर सातत्याने बलात्कार केला. तिने पोलिस ठाणे गाठले. या प्रकरणी तक्रार दाखल झाल्यावर विष्णूनगर पोलिसांनी प्रवीण पान्हेरकर या ४२ वर्षीय आरोपीला अटक करण्यात आली आहे. त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला दोन दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे. प्रवीण याने अन्य काही महिलांसोबत हा प्रकार केला आहे का याचा तपास पोलिसांनी सुरु केला आहे.

# छगन भुजबळ यांना पालकमंत्रीपद मिळावे महादेवाला घातले साकडे



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : छगन भुजबळ हे येवला येवला लासलगाव मतदारसंघात पाचव्यांदा आमदार झाले असून यावेळी त्यांना नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पद मिळावे याकरता येवल्यात राष्ट्रवादीच्या पदाधिकारी तसेच भुजबळ समर्थकांनी येवला मतदार संघात शहरातील महामृत्युंजय मंदिरात महादेवाची महाआरती करत साकडे घातले आहे.

# बांगलादेशात हिंदुंवर होणाऱ्या अत्याचारा विरोधात शिवसेना ठाकरे पक्षाचे तीव्र आंदोलन

दैनिक आपला विदर्भ



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : बांगलादेशात राहणाऱ्या हिंदुंवर सातत्याने होणारा अन्याय, अत्याचार व दडपशाही विरोधात शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्ष रस्त्यावर उतरला आहे. आज शिवसेना ठाकरे गटाकडून क्रांती चौकात तीव्र आंदोलन करण्यात आले. शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.

केंद्र सरकार बांगलादेशातील हिंदूंवर होणारे अन्याय, अत्याचार गप्प बसून बघत आहे. एकीकडे बांगलादेशाच्या पंतप्रधान शेख हसीना यांना आपल्या देशात आश्रय दिला जात आहे मात्र तेथील हिंदू निराधार झाला आहे. मागील काळात केंद्र सरकारने नागरिकत्व दुरुस्ती कायदा व नागरिकत्व नोंदणी कायदा करण्याचा निर्णय घेऊन स्थलांतरित पीडित हिंदूंना भारताचे नागरिकत्व देण्याचे ठरविले होते. मात्र, सध्या बांगलादेशात हिंदूंवर मोठ्या संख्येने अत्याचार होत असताना केंद्र सरकार गप्प बसून आहे अशी प्रतिक्रिया अंबादास दानवे यांनी दिली आहे. बांगलादेशातील हिंदू समाजातील जनतेवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ होणाऱ्या या आंदोलनात मोठ्या संख्येने हिंदू बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# निवडणुकीपूर्वी करोडो रुपयांच्या रस्ता कामाचे भूमिपूजन; रस्ते मात्र अद्यापही पूर्ण नाहीत

दैनिक आपला विदर्भ

■ शेख महेबूब

## उमरखेड तालुक्यातील प्रकार

**ढाणकी** : निवडणुकीपूर्वी उमरखेड तालुक्यात करोडो रुपयाच्या रस्ते विकासकामाचे भूमिपूजन करण्यात आले. मात्र अद्यापही रस्ते पूर्णत्वास गेलेले नाहीत, अशी तक्रार प्रहार जनशक्ती पक्षाचे बाळदी शाखाप्रमुख प्रवीण बाबुराव इंगळे यांनी उमरखेड उपविभागीय अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे २ डिसेंबर रोजी केली आहे. उमरखेड उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपच्या लोकप्रतिनिधींनी उमरखेड तालुक्यात व शहरातील रस्ते विकासकामाचे करोडो रुपयाचे भूमिपूजन केले. परंतु कुठल्याच रस्त्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. मागच्या पंचवार्षिकपासून सतत रस्त्यावरील डांबरीकरण उखळून रस्त्याची वाट लागलेली आहे. रस्त्यावर जागोजागी मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे वाहनधारकांना आपले वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. काही वाहनधारक खड्ड्यामुळे पडून गंभीर जखमी होत फॅक्चर सुद्धा झाले आहेत व काहींना आपला जीव गमववा लागला आहे. रस्त्याअभावी गरोदर महिलांना प्रस्तुतीसाठी आरोग्य केंद्रात नेण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. अशी भयानक व विदारक अवस्था तालुक्यातील रस्त्याची झालेली असून याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाला रस्ते दुरुस्ती करण्याचा अद्यापही मुहूर्त मिळत नसल्यामुळे उमरखेड महागाव मतदार संघात सर्वसामान्य नागरिक संताप व्यक्त करीत आहेत. तरी आपण याकडे लक्ष देऊन मतदारसंघातील रस्त्याचे रखडलेले कामे मार्गी लावावे, अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अन्यथा आक्रमक पवित्रा घेण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. निवेदनाच्या प्रतिलिपी उमरखेड सार्वजनिक बांधकाम उपविभाग व यवतमाळ जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांना दिलेल्या आहे.



# गरज सरो वैद्य मरो हा भाजपचा धर्म आहे

## माजी आ.बच्चू कडू यांची भाजपवर जहरी टिका

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : हरल्यानंतर खचू नये,दिव्यांगांचे काही महत्वाचे प्रश्न राहिले होते. आता ते सत्तेकडून कसे सोडवता येतील, हे पाहावे लागेल. सरकारला पहिले निवेदन देऊ, नाही मानले तर सरकारला मोठ्या आंदोलनाला सामोरे जावे लागेल. दिव्यांगांचे प्रश्न, विधवा महिलांचे प्रश्न, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आम्ही लढू, असे मत माजी आ. बच्चू कडू यांनी बुलढाणा येथे दिव्यांग पदाधिकाऱ्यांची बैठकी दरम्यान माध्यमांश बोलताना व्यक्त केले. तर भाजपवर टिका करताना गरज सरो वैद्य मरो हा भाजपचा धर्म असल्याची जहरी टिका यावेळी बच्चू कडू यांनी भाजपवर केली. यावेळी ते पुढे म्हणाले की, ईव्हीएम विरोधात आंदोलन होते आहे. व्हिव्हीपॅट बदलण्याचा मुद्दा आला पाहिजे,एकनाथ शिंदे यांची कोंडी केली का ?असा प्रश्न केला असता माध्यमांशी बोलताना मी एकनाथ शिंदेंना सांगत होतो की, तुमची कोंडी करण्याचा प्रयत्न होईल. कारण एकनाथ शिंदे हे एक मात्र मुख्यमंत्री होते. जे दोन वाजता सुद्धा सामान्य माणसाला भेटत होते. त्यामुळे भाजपाला वाटले होते की शिंदेंना थोडं दाबून ठेवू, सत्तेत असताना ते दाबू शकले नाहीत, त्यांचे काम बोलत होते. त्यांचा कोंडी करण्याचा प्रयत्न होणारच होता. कारण भाजपला एक हाती सत्ता घ्यायची आहे. देवेंद्र फडणवीस म्हणायचे की माझ्या एका फोनवर बच्चू कडू आले तो फोन सत्तेबद्दलचा होता. त्यानंतर त्यांचा कधीही कामासाठी फोन आला नाही. सत्तेसाठी देवेंद्र फडणवीस यांना फोन करता आला पण मित्रता टिकवण्यासाठी एक फोन करता आला नाही,असे मतही यावेळी बच्चू कडू यांनी व्यक्त केले. ईव्हीएम विरोध आंदोलन होत आहे, याबाबत माझे म्हणणे आहे की बॅलेट नाही तर मतदान नाही, काही ठिकाणी शंका वाटते. ज्या उमेदवारांच्या मुख्यमंत्र्याच्या सभेत चारशे लोक नव्हते, टू व्हीलर रॅली चारशे लोकांची होती आणि आमची पंधरा हजार लोकांची होती, प्रत्येकाच्या डोक्यात होते की बच्चू कडू निघणारच पण पडला कसा, हा चिंतेचा विषय आहे. असा प्रश्न यावेळी बच्चू कडू यांनी व्यक्त केला. तर मोहन भागवत, हा मुद्दा राजकीय आणि राष्ट्रहिताचा आहे. प्रत्येकाला दोन अपत्य असली पाहिजे,कधी कधी तर आम्हाला एकावर ही यावे लागेल असे वाढलेली लोकसंख्या पाहता दिसून येते.सगळ्यांसाठी बंधने असली पाहिजे, गुलाबराव पाटील म्हणतात




आमचे शंभर आमदार आले असते, हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. जेव्हा ते सोबत होते तेव्हा नाही म्हटले पाहिजे होते. निवडणूक व्हायचे अगोदर जर बोलले असते तर दम राहिला असता आता काही फायदा नाही. एकनाथ शिंदे नाराज नसते तर एकनाथ शिंदे फुटले नसते, सत्ता आली नसती, सत्तेमुळे आज जो घोटाळा करता आला तो शिंदे यांचे पायथ्यावर पडला. भाजपने एक चांगले काम केले की राज्यातले विरोधी पक्ष संपवण्याचे काम केले. मित्र पक्षाची तनातानी सुरू केली की तुम्हारा सिवा भी सरकार बन सकती है,अशा आकडेवारीत भाजपा येऊन गेली. तसाही भाजपचा धर्म हा गरज सरो वैद्य मरो हा हाच आहे. आता भाजपा देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा करेलच. मुख्यमंत्री कोणीही होऊ दे त्यांनी म्हटले होते की कर्ज माफ करू आता वाट पाहू, होऊ द्या आता मुख्यमंत्री. निवडणुकीत पराभव झाला असला तरी काम भरपूर होते. काही ठिकाणी मला सातशे मतदान आहे. एका ठिकाणी माझे पन्नास कोटींचे काम आहे. तिथे दोनशेच मते भेटली. काही संस्थांकडून जातीचे आणि धर्माचे गणित पटवून दिले गेले, काही पोस्ट टाकल्या गेल्या. धर्म आणि जात ही अफूची गोळी म्हणतात, त्याचा बळी पडलो. राणा दाम्पत्य चॅलेंज स्वीकारले का असा प्रश्न केला असता एवढ्या चांगल्या वेळेस त्यांचे नाव घेणे बरोबर वाटत नाही, असे बोलून त्यांनी राणा यांच्यावर बोचरी टिका केली. तर ईव्हीएमवर संशय घेण्यासारचा काही प्रकार दिसतो. ते मशीन आहे, त्यात छेडखानी होते. भाजपा सत्त्याकडे जाणारी पार्टी म्हणतात, सत्य त्यांचे प्रमाण असे ते म्हणतात. बटन दाबण्याचा प्रोसेस तशीच ठेवावी पण व्हीव्हीपॅट बाहेर आले पाहिजे. बॅलेटवर मतदान केंद्र आणि क्रमांक राहायचे त्यामुळे माझे मत कुठे गेले ते समजायचे. आता निवडणूक आयोग सांगू शकते का माझं मतदान कुठे गेले ते सांगा. राज्यघटनेने मतदान कुठे गेले ते पाहण्याचा अधिकार दिला आहे. पावती येते त्यावर मतदार क्रमांक का टाकत नाही तुम्ही त्यावर सही घ्या वाटल तर हे मन्युअली मोजता येईल, यापूर्वी एखाद्या नेत्याला सव्वा, दीड लाख मत भेटायची पण आता सरासरी एक लाख सव्वा लाख मत भेटतात. हे कशाचे द्योतक आहे. माझ्या मतदार संघात गारपीटीतील नुकसान भरपाईचे तीन लाख दिले, त्यांचे मतदान मला भेटले नाही, लाडक्या बहिणच्या नावाने हा प्रकार सुरू आहे. त्यावर पारदर्शकता येणे गरजेचे आहे. असे मत यावेळी माजी आ. बच्चू कडू यांनी व्यक्त केले.

## विविध वृत्त...

### अकोल्यात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनासमोर महिलांचे ठिय्या आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी** : जिल्ह्यातल्या पातूर तालुक्यातील चरणगाव येथे दलित वस्ती मध्ये झालेल्या घोटाळ्याच्या विरोधात स्थानिक महिलांचे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालना समोर ठिय्या आंदोलन सुरू आहे. १३ लाख रुपये एवढा निधी हा दलित वस्तीतील विकास कामासाठी आला होता, निधी येऊनही कुठलाच प्रकारची काम केली नसून निधी परत गेला. तर जोपर्यंत दलित वस्तीतील निधी पुन्हा मिळत नाही तोपर्यंत येथून उठणार नसल्याची प्रतिक्रिया आंदोलनकर्त्या महिलांनी दिली आहे.

### सिलेंडरचा स्फोट होऊन तीन-चार घरांचे प्रचंड नुकसान







दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी**: शहरातील विजयनगरमधील घटना अकोला. शहरातल्या देशमुख फाईल मधील विजयनगरमध्ये सिलेंडरचा स्फोट होऊन तीन ते चार घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ही घटना दि.२ डिसेंबर रोजी घडली. अग्निशमन दलाने वेळीच आगीवर नियंत्रण मिळविल्याने पुढील अनर्थ टळला. घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार अकोला शहरातील देशमुख फाईल मधील विजयनगरमध्ये सिलेंडरचा स्फोट झाल्यामुळे तीन ते चार घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.या घटनेची माहिती मिळताच अग्निशामक विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली, त्यामुळे या आगीत कुठलीही जीवित हानी झालेली नाही. मात्र घरांचे मोठे नुकसान झाले आहे. आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अग्निशामक विभागाचे दोन बंब लावून आगीवर नियंत्रण मिळविले.या घटनेची माहिती मिळताच अकोला पश्र्चिम विधानसभा मतदार संघाचे काँग्रेसचे नवनिर्वाचित आमदार साजिद खान पठाण यांनी घटनास्थळी भेट दिली व मदत मिळवून देण्याचे आश्र्वासन दिले आहे.तर अग्निशमन विभागाचे अधिकारी हारून मणियार यांनीही घटनास्थळी भेट देऊन आगीवर नियंत्रण मिळविण्याच्या दृष्टीने सर्वोतोपरी मार्गदर्शन केले.

### मनसे नेते अविनाश जाधव यांनी जिल्हाध्यक्ष पदाचा दिलेला राजीनामा घेतला मागे

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** : ठाणे पालखर विभागात जागा निवडून आणण्याची नैतिक जबाबदारी माझी होती.मात्र मला अपेक्षीत यश मिळाले नाही, म्हणून मनसे नेते अविनाश जाधव यांनी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता.मात्र तो राजीनामा आता मागे घेतला आहे.



मनसे नेते अविनाश जाधव यांनी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा मागे घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना सांगितले की, माझ्याकडे पक्षात असलेल्या तीन पदांपैकी एका पदाचा मी राजीनामा दिला होता. उर्वरित पदाने मी पक्षाचा नेता होतोच. राज ठाकरेंनी बोलवून ठाणे पालघर या दोन्ही जिल्ह्यांची जबाबदारी घेण्याचे आदेश दिले. याआधीही मी राज साहेबांच्या प्रत्येक आदेशाचे पालन केले आहे आणि पुढेही करेन असा विश्र्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. राजीनामा वगैरे अस काही नसते, माझ्या रक्तात राज ठाकरे आहेत. जिल्हाध्यक्ष पद गेल्याने माझी साहेबांप्रतीची निष्ठा, प्रेम कमी होणार नाही,राज साहेबांसाठी मी महाराष्ट्रभर फिरून पूर्ण ताकदीने लढणार आहे. मी आजपासून पुन्हा जिल्ह्याध्यक्षाचे काम बघणार असून साहेबांच्या आदेशाचे पालन करणार आहे. अशी माहिती माध्यमांशी बोलना मनसे नेते अविनाश जाधव यांनी दिली.

## वाहतूक पोलिसांकडून हेल्मेट विषयी जनजागृतीला सुरुवात

**अमरावती/प्रतिनिधी** : राज्यात दुचाकीवरील चालक तसेच त्यामागे बसणाऱ्या व्यक्तीलाही हेल्मेट घालण्याची सक्ती करण्यात आली आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणी अमरावती शहरात होताना दिसून येतेय. वाहतूक पोलिस विभागाकडून शहरातील गाडगे नगर, पंचवटी या भागांमध्ये हेल्मेट नसलेल्या दुचाकीस्वारांना थांबवून त्यांच्यामध्ये हेल्मेटविषयी जनजागृती तसेच त्याचे महत्व सांगण्यात येत आहे. अपघातात मृत्यू होण्याचे प्रमाण थांबविण्यासाठी हेल्मेट आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. तसेच दहा ते बारा वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई देखील यावेळी करण्यात आली. जोपर्यंत जनजागृती होत नाही, लोकांना हेल्मेटचे महत्व समजत नाही तोपर्यंत आम्ही करवाई सुरू ठेवू असे देखील वाहतूक पोलीस निरीक्षक, ज्योती विल्लेकर यांनी यावेळेस सांगितले आहे.



## अंचरवाडीत आकाशातून पडलं यंत्र; ते उपकरण हवामान विभागाचे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : बुलढाणा जिल्ह्यात चिखली तालुक्यातील अंचरवाडी येथे आकाशातून एक उपकरण पडले आहे. एका मोठ्या फुग्याला बांधलेले हे उपकरण आहे. अंचरवाडी येथील शेतकरी गावातील संजय सिताराम परिहार यांच्या शेतात हे यंत्र पडले आहे. सकाळी संजय परिहार यांचा मुलगा अविनाश परिहार आणि चुलत भाऊ वैभव परिहार हे कामानिमित्त शेतात गेले होते. यावेळी त्यांना दूरवरून शेतात काही तरी वेगळंच पडलेले दिसून आले. दोघांनी जवळ जाऊन पाहिले असता त्यांना मोठ्या फुग्याला जोडलेले हे यंत्र दिसून आले. अविनाश,वैभव यांनी याची माहिती देताच गावकरी, नातेवाईक यांनी घटनास्थळी धाव घेतली.

दरम्यान पोलीस आणि महसूलचे कर्मचारी दाखल झाले. हे उपकरण हवामान खात्याने सोडले असावे असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला. मात्र त्या उपकरणवर कोरियन भाषेत मजकूर असल्याने गूढ वाढले आहे. मात्र यंत्रावर कोरियन भाषेतील मजकूर असून या यंत्रांची निर्मिती कोरिया मध्ये झाल्याचा उल्लेख आहे. ते हवामान यंत्र दैनंदिन उपयोग येणारे असून हवामान विभागाकडून सोडण्यात येत असते त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये जर असे कुठे आढळल्यास तहसीलदार किंवा जिल्हा प्रशासनाकडे संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी संभाजी पवार यांनी केले आहे.

## जागतिक स्तरावर योग संशोधनासाठी केंद्र सरकारने केली १५.३० कोटी रुपयांची गुंतवणूक : केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जागतिक स्तरावर योग अभ्यासाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनातुन आयुष मंत्रालय यांनी शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि वेलनेस हब यांच्या सोबत १५.३० कोटी रुपयांची गुंतवणूक केल्याची माहीती केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली. भारतीय पारंपारीक योग साधनेला जागतिक स्तरावर विशेषस्थान मिळवुन देण्यासाठी केंद्र सरकारच्या वतीने प्रयत्न केल्या जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विशेष प्रयत्नांमुळे २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून सर्वत्र साजरा केला जात आहे. जागतिकस्तरावर योग अभ्यासाला प्रोत्साहन मिळावे या दृष्टीकोनातुन आयुष मंत्रालयाच्या वतीने विशेष अभियान राबविल्या जात जाणर असुन त्यासाठी. १५.३० कोटी रुपयांचीही तरतुदही करण्यात आली आहे. या अभियानाच्या माध्यमातुन योग साधनेविषयी अभ्यासाला चालना मिळणार आहे. त्या दृष्टीकोनातुन केंद्रीय आयुष मंत्रालयाने शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि वेलनेस हब यांच्यासोबत योगावरील संशोधन प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीकोनातुन ही गुंतवणूक केली आहे. त्यामुळे जगभरातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी मदत होणार असुन शिक्षणामध्येही योगाचे भविष्य घडविणाऱ्या परीवर्तनीय अभ्यासाचा मार्ग मोकळा होणार आहे असा विश्र्वास केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केला आहे.



# आला रे आला बिबट्या आला!; परिसरात आफवांना उधाण : नागरिक भयभीत, वनविभागही मेटाकुटीस

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/विशेष प्रतिनिधी** : तालुक्यातील अंजनी बु. शिवारात ३० नोव्हेंबर रोजी रात्री बिबट्याच्या आढळल्याची घटना समोर आली. त्यानंतर एकच खळबळ उडाली, बिबट्याच्या शोधासाठी वन विभागाचे परिक्षेत्र अधिकाऱ्यांनी शोधल शोध मोहीमही राबवली. मात्र, बिबट्या काय आढळून आला नाही. याबाबत वनविभागाच्या वतीने सतर्क बाळगण्याचे आवाहन करण्यात आले, मात्र गत दोन दिवसापासून अंजनी परिसरात आला रे आला बिबट्याला आला अशा अफवांना उधाण आले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक, शेतकरी भयभीत झाले असून वन विभागाची मात्र, बिबट्याचा शोध घेण्याबरोबरच नागरिकांना समजावविताना दमछाक होत आहे. घाटबोरी वनपरिक्षेत्र अंतर्गत अंजनी बु.रात्री आढळून आल्याची माहिती वनविभागाला मिळाली.वनविभागाचे कर्मचारी अधिकारी घटनास्थळी येताच

संग्रहीत छायाचित्र



शेतकरी व नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. या घटनेचे गांभीर्य ओळखत वनविभागाने घटनास्थळी भेट देऊन बिबट्याचा शोधासाठी शोधमोहीम हाती घेतली. त्याचबरोबर परिसरातील शेतकऱ्यांनी सतर्कता बाळगावी, शेतात जातानी एकटे जाऊ नये, हातात काठी ठेवावी, शेतात खाली बसून राहू नये, अशा अनेक सूचना यावेळी वनविभागाच्या वतीने करण्यात आल्या. त्याचबरोबर बिबट्या आढळल्यास त्वरित वन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.मात्र, गेल्या दोन दिवसापासून बिबट्याचा पत्ता लागत नसल्याने वनविभाग हे हतबल झाला आहे. तर अंजनी बु. परिसरासह इतरही ठिकाणी आला रे आला बिबट्या आला अशा अफवांना उधाण आले आहे. त्यामुळे परिसरातील शेतकरी, महिला यासह इतर नागरिक भयभीत झाली आहेत. नागरिक घराबाहेर पडायला मागेपुढे पाहत आहेत. बिबट्याच्या भीतीपोटी अनेक कामेही ठप्प पडली आहेत. घराबाहेर पडायचे असल्यास एकट्याने न पडता सोबतीला कोणीतरी घेत बाहेर पडून कामाला प्राधान्य दिले जात आहे, असे असताना वन विभाग मात्र बिबट्याचा शोध घेता घेता दमछाक होत आहे. आला रे आला बिबट्या आला ही अफवा मात्र अनेकांसाठी डोकेदुखी ठरली आहे. यावर वनविभाग ही मात्र क्शन मोडमध्ये आला असून त्यांनी अफवा पसरणारा दमच देऊन टाकला आहे.

### खोटी अफवा व खोटे व्हीडीओ पसरवणारांवर कारवाई

अंजनी बु. परिसरामध्ये बिबट्याने हल्ला केल्याचे खोटे व्हीडीओ आणि अफवा काही लोक पसरवीत आहेत. ही अफवा कोणीही पसरू नये, सोशल माध्यमाद्वारे असे व्हिडिओ व खोटी अफवा पसरून दहशत निर्माण करू नये, बिबट्या, वाघ निदर्शनास आल्यास वन विभागाला कळवावे, वन विभाग २४ तास मदत करण्यास कटिबद्ध आहे. सोशल मीडियावर खोटी माहिती प्रसारित करणे समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणे कायद्याने गुन्हा आहे. त्याचा फायदा काही समाविघात घेत असून खोटी माहिती प्रसारित केल्याचे आढळल्यास संबंधीतावर व ग्रुप ॲडमिनवर सुद्धा कारवाई करण्यात येईल, असा इशारा वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी दिला आहे.